# बृहन्महाराष्ट्र मंडळ

कार्यालय निवडणूक अधिकारी (महाराष्ट्र सूचना, नवी दिल्ली)

(305, उषानगर एक्सटेन्शन, रणजीत हनुमान मेन रोड, पूनम ज्वेलर्स च्या वर, इंदौर (मध्यप्रदेश) 452009)

इंदूर , गुरुवार 13-01-2022

## निवडणूक संबंधातील महत्वपूर्ण सूचना

संदर्भ: मतदान अधिसूचना प्रसिद्धी दिनांक 28 ऑक्टोबर 2022

समस्त मतदान अधिकार प्राप्त सभासद आणि समस्त उमेदवार यांच्या सूचनार्थ कळविण्यात येत आहे कि माझ्या द्वारे गुरुवार दिनांक 28 ऑक्टोबर 2021 रोजी प्रसिद्ध निवडणूक अधिसूचनेत माझ्या द्वारे निवडणूकी साठीचे जे वेळापत्रक घोषित करण्यात आले होते, त्यातील क्रमांक 1 ते क्रमांक 6 पर्यंतच्या सर्व प्रक्रिया/गतीविधी पूर्ण झालेल्या असून बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणीचे, प्रधान कार्यवाह यांच्या मार्फत प्राप्त निवेदन आणि सांप्रत इंदौर (मध्य प्रदेश) येथे कोरोना महामारीच्या विशेष परिस्थितीत राज्य आणि स्थानिक प्रशासनाद्वारे आदेशित निर्बंध आणि सार्वजनिक आरोग्य सल्ल्याच्या पालनांतर्गत उर्वरित क्रमांक 7 ते क्रमांक 9 वर नमूद तीनही प्रक्रिया/गतीविधी पूर्व घोषित तिथीस अर्थात अनुक्रमे 30/01/2022 (रविवार) आणि 15/02/2022 (मंगळवार) रोजी निष्पादित करता येणार नाही.

संदर्भित अधिसूचनेत नमूद केल्या प्रमाणे वेळापत्रकातील उर्वरित क्रमांक 7 ते क्रमांक 9 पर्यंतच्या तीनही प्रक्रिया/गतीविधी निष्पादित करण्याच्या नवीन तारखा कोरोना महामारीची परिस्थिती, राज्य आणि स्थानिक प्रशासनाद्वारे आदेशित निर्बंध आणि सार्वजनिक आरोग्य सल्ल्याच्या अधीन यथासंभव लवकरात लवकर घोषित करण्यात येतील आणी सूचना आणि उर्वरित गतीविधी करिता घोषित तारखांमध्ये पर्याप्त दिवसांची अवधि दिला जाईल. येथे स्पष्ट करण्यात येत आहे कि उपाध्यक्ष, कार्यवाह (महिला) आणि विभागीय कार्यवाह (माळवा) वगळता उर्वरित सर्व पदांकरिता मतदानाची आवश्यकता नसल्यामुळे नवीन वेळापत्रकात मतदान या गतीविधींमध्ये फक्त उपाध्यक्ष, कार्यवाह (महिला) आणि विभागीय कार्यवाह (माळवा) अश्या तीन पदांकरीताच मतदानाची तिथी व वेळेचा समावेश असेल.

सर्वांनी नोंद घ्यावी कि टपाल मतपत्र आवेदनाची मुदत पूर्वीच संपल्या मुळे नवीन आवेदने आता घेण्यात येणार नाही तसंच निर्धारित अवधीत प्राप्त सर्व टपाल मतपत्रे प्राप्त स्थितीतच सुरक्षित ठेवण्यात येतील आणि मतमोजणीच्या वेळेस पूर्वघोषित विधी प्रमाणे प्रक्रियेत सामील करण्यात येतील. तसंच आता पर्यंत मतदाता सूचित नाव जोडण्या संबंधीच्या प्राप्त निवेदनांच्या सत्यापनाच्या आधारे पूर्वघोषित तिथी दिनांक 29 जानेवारी 2022 रोजी प्रथम पूरक मतदाता यादी प्रसिद्ध केली जाईल. मतदाता सभासदांच्या सुविधे करिता आता अवधी मिळाल्या मुळे नांव जोडण्याचे कार्य पुढील सूचने पर्यंत चालू ठेवण्यात येत आहे तरी फक्त 28-10-2021 पर्यंत सभासदत्व घेतलेल्यांचेच नाव जोडण्यात येईल.

पुढील प्रक्रीयेशी निगडीत तपशीलवार माहिती/सूचना बृहन्महाराष्ट्र मंडळ इंटरनेट संकेत स्थळावर तसंच अवधी उपलब्ध असल्यास मुखपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल तरी संबंधितांनी इंटरनेट संकेत स्थळावर भेट देत राहावी.

आज दिनांक 13-01-2022, गुरुवार रोजी इंदूर येथे माझ्या सही व शिक्क्यासह ही अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली.

श्रीमती शरयू भालचंद्र वाघमारे
निवडणूक अधिकारी

निवडणूक अधिकारी
बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली

प्रतिलिपी :

1. प्रधान कार्यवाह , (कार्यकारीणीच्या सूचने करिता )
2. मुखपत्र प्रभारी , (सभासदांना मुखपत्र माध्यामांतून सूचनार्थ)
3. सूचना प्रौद्योगिकी प्रभारी, (सभासदांना इंटरनेट संकेतस्थळ माध्यामांतून सूचनार्थ)
4. समस्त मतदानाधीन पदांचे उमेदवार (सूचनार्थ)